महापालिका सहाय्यक आयुक्त कार्यालय,
कोंढवा-उंड्री, पुणे महानगरपालिका.
कार्यालयाचा पत्ता- जे.एस.पी.एम.बिल्डींग,
सावंत कॉर्नर, कात्रज, पुणे-४११०४६
कार्यालयाचा संपर्क क्र. :- ०२०-२५५०८८००
ई-मेल:- kondhwa@punecorporation.org
विस्तारित क्र.:- ०२०-२५५०८८००
जावक क्र. :- ९४३३ दिनांक:-e1e12e

माहिती अधिकार

अपिल प्राधिकारी तथा महा.सहा.आयुक्त, कोंढवा-उंड्री
पुणे महानगरपालिका यांचे कार्यालय

१. अपिलार्थी
श्री.असलम इसाक बागवान
सर्व्हे नं. ५९/४, शिवनेरी नगर
लेन नं. ३३, कोंढवा खुर्द
पुणे- ४११०४८
संपर्क:- ८८०५४८५७१९

२. श्री.जीवन मराळे
जन माहिती अधिकारी तथा अधिक्षक
कोंढवा- उंड्री कार्यालय, पुणे महानगरपालिका.

अपिलार्थी श्री. असलम इसाक बागवान
विरुद्ध
जन माहिती अधिकारी तथा अधिक्षक पुणे महानगरपालिका.
माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (१) अन्वये प्रथम अपिल

माहिती अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत अपिलार्थी श्री. असलम इसाक बागवान यांनी दि. १०/०३/२०२६ रोजी अधिक्षक तथा जन माहिती अधिकारी महापालिका सहाय्यक आयुक्त कोंढवा उंड्री क्षेत्रीय कार्यालय यांचेकडे अर्ज करून माहितीची मागणी केलेली आहे.

माहिती अधिकार अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकाऱ्याने उपलब्ध करून दिलेली माहिती व इतर पत्र व्यवहार संबधीची माहिती.

माहिती अधिकारातील अर्जाचा तपशील				
माहिती अधिकारांतर्गत अर्ज सादर केल्याचा आवक क्र. व दिनांक	माहिती उपलब्ध करून द्यावयाचा अंतिम दिनांक	अर्जदारास उत्तर पाठविल्याचा जावक क्र. व दिनांक	अर्जदाराने शुल्क भरल्याचा दिनांक	अर्जदारास माहिती दिल्याचा दिनांक
आ.क्र. ११०६७४ दि.०२.०२.२०२६	दि.१०/०३/२०२६	जा.क्र. १०४२९ दि.२४/०३/२०२६	-	-

प्रथम अपिल अर्ज दाखल करण्याचे कारण :-
माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत अर्ज करून पुढील माहिती मागविली होती: वर्ष २०२१ ते फेब्रुवारी २०२६ या कालावधीत संबंधित क्षेत्रीय कार्यालयांतर्गत क्षेत्रसभा घेण्यात आल्या का?
त्या क्षेत्रसभांचे कार्याध्यक्ष कोण होते?

त्या संदर्भातील पत्रव्यवहार व प्रशासकीय नोंदी.

प्रथम अपिल अर्जाचा तपशिल				
प्रथम अपिल अर्ज दाखल करावयाचा अंतिम दिनांक	प्रथम अपिल दाखल केल्याचा दिनांक	प्रथम अपिल अर्ज मुदतीत दाखल केला आहे का?	प्रथम अपिलाच्या विलंबाबाबत निवेदन दिले आहे का?	प्रथम अपिल सुनावणी सूचना पाठविल्याचा जावक क्र. व दिनांक
दि.१०/०३/२०२६	आ.क्र. १०६७४ दि.१०/०३/२०२६	होय	-	जा.क्र. १६६ दि.०९/०४/२०२६

प्रथम अपिल सुनावणी दिनांक व वेळ:- १६.०४२०२६ रोजी दुपारी ०३.०० वाजता
सुनावणीस अपिलकर्ता :- उपस्थित
सुनावणीस जन माहिती अधिकारी :- उपस्थित

विवेचन

माहिती अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत माहिती अधिकार अर्जावरील सुनावणी मध्ये अपिलार्थी हे उपस्थित होते तसेच श्री. जीवन मराळे जनमाहिती अधिकारी तथा अधिक्षक उपस्थित होते. माहिती अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत कलम ६ (१) अन्वये केलेल्या अर्जानुसार वर्ष २०२१ ते फेब्रुवारी २०२६ या कालावधीत कोंढवा-उंड्री क्षेत्रीय कार्यालयांतर्गत क्षेत्रसभा संबंधित विचारण्यात आलेला माहितीचा तपशील नमूद केलेनुसार निरंक आहे.

आदेश

मा.महापालिका सहाय्यक आयुक्त, कोंढवा उंड्री कार्यालय यांनी आदेशित केलेनुसार जन माहिती अधिकारी तथा अधिक्षक यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत प्राप्त झालेल्या मूळ अर्जात विचारणा केलेनुसार सदर अर्जाच्या अनुषंगाने केलेल्या कारवाईची विभागाकडे उपलब्ध माहिती निरंक आहे.

सबब सदरचे अपिल निकाली काढण्यात येत आहे.

(सुचिता पानसरे)
प्रथम अपिलीय अधिकारी तथा
महा.सहा.आयुक्त
कोंढवा उंड्री क्षेत्रिय कार्यालय
पुणे महानगरपालिका

दिनांक:-
ठिकाण:-पुणे

टीप:- १) सदर माहितीने अपिलार्थी यांचे समाधान न झाल्यास माहिती अधिकार अधिनियम कलम १९ (३) अन्वये निर्णय प्राप्त झाल्यापासून ९० दिवसांच्या आत मा. आयुक्त राज्य माहिती आयोग, नवीन प्रशासकीय इमारत, विधानभवन समोर पुणे-४११००१ यांचेकडे द्वितीय अपिल करता येईल.
२) या आदेशाची प्रत पुणे महानगरपालिकेच्या www.punecorporation.org या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.